# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनाट क्रमांक २४३-२२** **दिनांक ०८/०८/२०२२**

## Rupee Tiger (FAKE Loan) ॲपद्वारे फसवणूक करणाऱ्या आरोपींना पकडण्यात सायबर गुन्हे कक्षास यश

भाईंदर पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारे इसम नामे पारस गांधी, रा. भाईंदर (प) हे इंटरनेटवर सर्फींग करीत असताना त्यांना लोन ॲपची जाहिरात दिसली. त्यांनी सदर ॲप डाऊनलोड करुन त्या ॲपला सर्व Permissions Allow करुन त्याद्वारे लोन घेतले. सदर लोनच्या रक्कमेपेक्षा जास्त रक्कम त्यांचेकडून घेण्यात आली व त्यांना फसवणूक होत असल्याची खात्री झाल्यानंतर त्यांनी अधिक लोन रक्कमेची मागणी केलेली नसताना त्यांना रक्कम भरण्याकरीता आरोपीतांनी धमक्या देवून तसेच त्यांचे फोन मधील फोटो मॉर्फींग करुन त्यांचे फोन कॉन्टॅक्ट यादीतील लोकांना पाठविले. सदरबाबत तक्रारदार यांनी सायबर गुन्हे कक्ष येथे तक्रार दिल्याने त्याबाबत कौशल्यपुर्वक तांत्रीक चौकशी करुन संशयित नामे १) दिपक क्रिपाशंकर मिश्रा, वय-२७ वर्षे, व्यवसाय - SKYLINE INTERNATIONAL IMPORT AND EXPORT रा.रुम नं १११, बि विंग, बलदेव अपार्ट,साई नगर, वसई पश्चिम, पालघर, २) विल्बर राल्फ शर्मा, वय – ३३ वर्षे, रा. ए/१५, तिसरा माळा, रोज मेरी बिल्डींग, बिच कॉम्पलेक्स, नायगाव, वसई (पश्चिम), ता.वसई,जि.पालघर ३) मनोज विदेशी शर्मा, वय ३३ वर्षे, रा.१०६, पहीला माळा, स्कॉयटेक्स बिल्डींग, वाकीपाडा, नायगाव पुर्व ता.वसई जि.पालघर, ४) महिला आरोपी वय २१ वर्षे रा. गोकुळधाम सोसा, मिनानगर, वसई (प) ता.वसई, जि.पालघर ५) रोशन पिटर डिसोजा वय २७ वर्षे रा. ई-०१, न्यु अनुराधा सोसा, आमंत्रण बार समोर, राधानगर, नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर यांचेकडे चौकशी करुन आरोपी क्र. ०१ ते ०३ यांना दिनांक ०४/०८/२०२२ रोजी व आरोपी कमांक ०४ ते ०५ यांना दिनांक ०५/०८/२०२२ रोजी ताब्यात घेवून भाईंदर पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आलेले आहे. सदर आरोपीतांविरुध्द भाईंदर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ३६८/२०२२ भा.दं.वि.स. कलम ३८४, ४२०, ३४, ५०४, ५०६ आय.टी.ॲक्ट ६६ (डी) गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), अति.कार्य. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, पोलीस अंमलदार/१२०९२ प्रविण आव्हाड, १२०९५/गणेश इलग, महीला पोलीस अंमलदार/ १२००७ माधूरी धिंडे, १६१०६/सुवर्णा माळी, म.सु.ब.आकाश बोरसे यांनी पार पाडली आहे.

**----0000----**